# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १.५ कि. मी. अंतरावर गहुहिवरा रोड नियर पानतावने कॉलेज कन्हान येथे दिनांक ३१/१२/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०१/०१/२०२४ चे ०१.०० वा. पर्यंत यातील फिर्यादी नामे– अनमोल शिखासन चव्हान वय ३५ वर्ष रा. गहुहिवरा रोड नियर पानतावने कॉलेज कन्हान याची पत्नी ही मेओ हॉस्पीटल नागपुर येथे भरती असल्याने फिर्यादी हा दिनांक ३१/१२/२०२३ रोजी आपल्या पत्नीला भेटण्या करीता गेला व रात्री ०१/०० वा. दरम्यान परत घरी आला तेव्हा त्यांच्या घराचा दरवाजा हा त्यांना उघडा दिसला व गोदरेज कंपनीची आलमारी मधील सोन्या चांदिचे दागीने व नगदी ८०,०००/– रूपये मिळुन आले नाही व गोदरेज अलमारी मध्ये १) सोन्याचे लॉकेट १.४७० ग्रॅम, २) अंगठी १.१० ग्रॅम, ३) टॉप्स २.०७० ग्रॅम, ४) अंगठी ३ ग्रॅम, ५) चैन ६ ग्रॅम, ६) डोरले ३ ग्रॅम, ७) अंगठी २.६७ ग्रॅम, ८) नथनी ०.१८ ग्रॅम ९) अंगठी १.८३ ग्रॅम, १०) चैन ८.५४ ग्रॅम, ११) लॉकेट ३.१४ ग्रॅम, १२) अंगठी ३ ग्रॅम, १३) सुई धागा ५.३ ग्रॅम, १४) हापसेट कानाचे ३३.९७० ग्रॅम असे सोन्याचे एकुण दागीने ८५.६१ ग्रॅम किंमती ३,४२,४००/– रूपये व चांदिचे दागीने ५५५ ग्रॅम किंमती २२,२००/– रूपये असा एकुण ४,४४,६००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग कामठी पुंडलिक भटकर, पोनि सार्थक नेहते पोस्टे कन्हान यांनी भेट दिली असुन सदर घटनास्थळी फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली आहे. तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि अमितकुमार आत्राम पो.स्टे. कन्हान मो. क्रं. ९४०५१९४३१७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत मौजा झेंडा चौक वार्ड क्र. ३ जुनी वस्ती ब्राम्हणी येथे दिनांक ०१/०१/२०२४ चे ०१.३० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शेषराव गुलाबरराव केदार, वय ६६ वर्ष रा. वैशाली नगर सावनेर रोड वार्ड क्र. ३ ब्राम्हणी ता. कळमेश्वर हे राम मंदीरात दर्शनाकरीता गेले असता त्यांना राम, लक्ष्मण, सिता यांचे मुर्ती असलेले गर्भगृहाचे कुलुप तुटलेले दिसले आणि तिन्ही मुर्तीचे चांदीचे मुकुट व पितळी समई दिसली नाही. राम मंदीर येथील राम, लक्ष्मण, सिताचे मुर्ती असलेले गर्भगृहाचे कोणीतरी अज्ञात चोराने कुलुप तोडुन आत प्रवेश करून ३ मृर्तीचे चांदीचे मुकुट, वजन अंदाजे २०० ग्रॅम किंमती १०,०००/– रू, १ पितळी समई किंमती २००/– रू. असा एकुण १०,२००/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक त्रिपाठी, महिला पोलीस उपनिरीक्षक गेडाम मॅडम यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पोटभरे मो. नं. ८३२९७७७७९१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर